**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारताची बाजू जगभरात मांडण्यासाठी शिष्टमंडळं रवाना होण्यास सुरुवात

- छत्तीसगडमधे झालेल्या चकमकीत वीसपेक्षा जास्त माओवादी ठार, एक जवान शहीद

- राज्यात पुढचे चार दिवस मुसळधार पावसाची शक्यता

- कन्नड लेखिका बानू मुश्ताक यांच्या ‘हार्ट लॅम्प’ या लघुकथासंग्रहाला प्रतिष्ठेचा बुकर पुरस्कार जाहीर

**आणि**

- ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरची माहिती सर्व देशांना देण्यासाठी आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद जगासमोर आणण्यासाठी भारतानं आखलेल्या धोरणांतर्गत संयुक्त जनता दलाचे खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालचं सर्वपक्षीय शिष्टमंडळ आज पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झालं. हे शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, कोरिया, जपान आणि सिंगापूरला भेट देईल. रवाना होण्यापूर्वी संजय झा यांनी वार्ताहरांशी संवाद साधला.

शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळही आज रवाना होणार आहे. हे शिष्टमंडळ संयुक्त अरब अमिराती, काँगो, लायबेरिया आणि सिएरा लिओन या देशांना भेट देईल.

या धोरणांतर्गत एकूण सात सर्वपक्षीय शिष्टमंडळं ५ जूनपर्यंत ३२ देशांना भेट देऊन भारताची भूमिका समजावून सांगणार आहेत.

<><><><>

पंजाबमधल्या अमृतसर इथं एका पाकिस्तानी घुसखोराला सीमा सुरक्षा दलानं काल अटक केली. ही व्यक्ती आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारतीय सीमेच्या आत येण्याचा प्रयत्न करत होता, सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी त्याला थांबवलं आणि ताब्यात घेतलं. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे ३३० पाकिस्तानी रुपये सापडले. सीमा सुरक्षा दलानं त्याला स्थानिक पोलिसांच्या ताब्यात दिलं आहे.

<><><><>

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात आणि राज्यात विविध ठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्तानं ऑपरेशन सिंदूरचं यश अधोरेखित करण्यासाठी नागपूर शहर काँग्रेसनं तिरंगा यात्रा काढली.

**लातूर जिल्ह्यातही** शिवसेनेतर्फे तिरंगा यात्रा काढण्यात आली. यावेळी जिल्ह्यात सीमेवर सेवा बजावत असलेल्या जवानांच्या कुटुंबियांचा तसंच सेवानिवृत्त जवानांचा सत्कार करण्यात आला.

काँग्रेसच्या जिल्हा समितीतर्फे आज **वाशीम** इथं तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेत माजी सैनिक सहभागी झाले होते.

ऑपरेशन सिंदूर संदर्भात नागरिकांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया ऐकु या

**होल्ड बाईट**

<><><><>

छत्तीसगडच्या नारायणपूर, विजापूर आणि दंतेवाडा भागात सुरक्षादलांशी ५० तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या चकमकीत वीसपेक्षा जास्त माओवादी ठार झाले. यात काही कुख्यात माओवाद्यांचा समावेश असल्याची शक्यता आहे. यात एक जवान शहीद झाल्याची तर आणखी एक जवान जखमी झाल्याची माहिती छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री विजय शर्मा यांनी दिली आहे. ही कारवाई जवळपास संपल्याचं आणि या भागात मोठी शोधमोहीम सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

अमृत भारत स्थानक योजने अंतर्गत १८ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या १०३ पुनर्विकसित रेल्वे स्थानकांचं उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या करणार आहेत. या रेल्वेस्थानकांवर अद्ययावत प्रतीक्षालय, शौचालय आणि निवाऱ्याचा समावेश आहे. याशिवाय विविध सुविधा या रेल्वेस्थानकांवर देण्यात आल्या आहेत.

<><><><>

माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या ३४व्या स्मृतिदिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नवी दिल्लीतल्या वीरभूमी इथं जाऊन राजीव गांधींना श्रद्धांजली वाहिली.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी मन की बात या कार्यक्रमाद्वारे येत्या रविवारी जनतेशी संवाद साधणार आहेत.

श्रोते या कार्यक्रमासाठी त्यांच्या सूचना १ ८ ० ० १ १ ७ ८ ० ० या टोल फ्री क्रमांकावर पाठवू शकतात. नरेंद्र मोदी ॲप आणि माय गव्ह ॲपद्वारेही आपल्या सूचना २३ मे पर्यंत पाठवता येतील.

**<><><><><>**

मुंबई शहर, उपनगरासह कोकणात काल वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडला असून आणखी चार दिवस राज्यात पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. पालघर, ठाणे, मुंबई जिल्ह्यांना आज आणि उद्यासाठी यलो तर रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी आज आणि उद्या ऑरेंज अलर्ट हवामान विभागानं दिला आहे. मान्सूनच्या अनुकूल स्थितीमुळे वेळेपूर्वीच पावसाला सुरुवात झाली असून यंदा चांगला पाऊस होण्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात गेल्या १५ दिवसांपासून बिगरमोसमी पाऊस होत आहे.

**मुंबई आणि उपनगरातही** काल संध्याकाळी विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाटासह पाऊस पडला. ठाण्यातही सोसाट्याचा वाऱ्यांसह मुसळधार पाऊस पडला.

**पुणे शहरात** पावसामुळे होर्डिंग कोसळून काही दुचाकींचं नुकसान झालं. मुसळधार पावसामुळे शहाराच्या सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचलं होतं.

**नाशिक शहरासह** जिल्ह्यातही अनेक ठिकाणी काल वादळी वाऱ्यांसह पाऊस पडला. मौजे सोनगिरी इथं वीज पडून एकाचा मृत्यू झाला.

**रत्नागिरीत जिल्ह्यात** अनेक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला.

**सिंधुदुर्ग जिल्ह्याला**ही मान्सूनपूर्व वादळी पावसानं झोडपून काढल्यानं जनजीवन विस्कळीत झालं.

**<><><><><>**

कन्नड लेखिका, वकील आणि सामाजिक कार्यकर्त्या बानू मुश्ताक यांनी लिहिलेल्या आणि दीपा भस्थी यांनी इंग्लिशमध्ये भाषांतरित केलेल्या ‘हार्ट लॅम्प’ या लघुकथासंग्रहाला प्रतिष्ठेचा बुकर पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारावर

नाव कोरणारा हा पहिलाच लघुकथासंग्रह आणि पहिलीच मूळ कन्नड साहित्यकृती आहे. तसंच दीपा भस्थी या बुकर पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्याच भारतीय भाषांतरकार आहेत. दक्षिण भारतातल्या पुरुषसत्ताक व्यवस्थेचा सामना करणाऱ्या महिला आणि मुलींची व्यथा मांडणाऱ्या १२ कथा या संग्रहात आहेत.

**<><><><><>**

ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्यावर आज पुण्यातल्या वैकुंठ स्मशानभूमीत संपूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यापूर्वी बंदुकांच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना देण्यात आली. आज सकाळी त्यांचं पार्थिव आयुका इथं अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासह इतर मान्यवरांनी डॉ. नारळीकरांचं अंत्यदर्शन घेतलं. डॉ. नारळीकर यांचं वयाच्या ८६व्या वर्षी काल पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं होतं.

**<><><><><>**

पाकिस्तान सोबत केलेल्या अघोषित युद्धाबाबत चांगली कामगिरी केल्याचं प्रमाणपत्र शरद पवार यांनी नुकतंच दिलं आहे, त्यामुळे शरद पवार हे आता भाजपामय होत असल्याची टीका, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. ते लातूरमध्ये पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलत होते.

**<><><><><>**

माजी सनदी प्रशिक्षणार्थी पूजा खेडकरला आज सर्वोच्च न्यायालयानं अटकपूर्व जामीन मंजूर केला. पूजा खेडकर तपास यंत्रणांना सहकार्य करत नसल्याचा आणि तिच्यावर असलेले आरोप गंभीर स्वरूपाचे असल्याचा राज्य सरकारचा युक्तिवाद न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या पीठानं फेटाळून लावला.

**<><><><><>**

देशाचे सरन्यायाधीश जेव्हा राज्याच्या दौऱ्यावर येतील, तेव्हा विहीत राजशिष्टाचाराचं पालन व्हावं, यासाठी राज्य सरकारनं मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई नुकतेच मुंबई दौऱ्यावर आले असताना शिष्टाचाराचा भंग झाल्याच्या पार्श्वभूमीवर या सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

या प्रकरणी राज्यातल्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे निर्देश केंद्र सरकारला देण्याची मागणी करणारी जनहित याचिका आज सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं चेन्नई सुपर किंग्सचा ६ गडी राखून पराभव केला. आज मुंबईच्या वानखेडे मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता मुंबई इंडियन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे. या सामन्यावर पावसाचं दाट सावट आहे.

**//<><><><><>//**